| MHLA150008332016 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | २३/०९/२०१६ |
| | नोंदणी दिनांक | : | २३/०९/२०१६ |
| | निकाल दिनांक | : | १२/०६/२०२५ |
| | कालावधी | : | ०८व. ०८म. १९दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय **VI** परिच्छेद क्र. ४४ **(I)**)

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी – व्ही.एस. वाघमोडे यांच्या समोर.) | |
| | **नियमीत फौजदारी खटला क्र.१११/२०१६**<br>नि.क्र. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकूर, ता. चाकूर जि. लातूर | |
| सहा. सरकारी अभियोक्ता | | श्रीमती पी.एस. भराडीया |
| आरोपी | १. | जावेद अमिन मुजावर,<br>वय – २५ वर्ष, धंदा – मजूरी, |
| | २. | नजमुनबी अमिन मुजावर,<br>वय – ६० वर्ष, धंदा – मजूरी, |

| | | |
|---|---|---|
| | ३. | अमिन दाऊ मुजावर,<br>वय – ६५ वर्ष, धंदा – मजूरी, |
| | ४. | दाउत अमिन मुजावर,<br>वय – ३५ वर्ष, धंदा – मजूरी, |
| | ५. | हसिनाबी अमिन मुजावर,<br>वय – २२ वर्ष, धंदा – मजूरी,<br>वरील सर्व रा. आटोळा ता. चाकूर जि. लातूर |
| आरोपींचे विधीज्ञ | | श्री. एस.बी. व्हत्ते |

## भाग – ब

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय **VI** परिच्छेद क्र. ४४ (**ii**))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | दि.१७.०५.२०१५ रोजीच्या ३ महिन्यानंतर पासून ते ०७.०८.२०१६ रोजी पर्यंत. |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०७/०८/२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २३/०९/२०१६ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | ०६/०२/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०६/०२/२०१९ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | –– |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १२/०६/२०२५ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्माविण्याचा दिनांक | – – |

## आरोपीचा तपशिल

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जावेद अमिन मुजावर | ०८/०८/२०१६ फौ.प्र.सं. कलम ४१(अ) ची नोटीस | ०८.०८.२०१६ | भा दं वि कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| २ | नजमुनबी अमिन मुजावर | ०८/०८/२०१६ फौ.प्र.सं. कलम ४१(अ) ची नोटीस | ०८.०८.२०१६ | भा दं वि कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ३ | अमिन दाऊ मुजावर | ०८/०८/२०१६ फौ.प्र.सं. कलम ४१(अ) ची नोटीस | ०८.०८.२०१६ | भा दं वि कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ४ | दाउत अमिन मुजावर | ०८/०८/२०१६ फौ.प्र.सं. कलम ४१(अ) ची नोटीस | ०८.०८.२०१६ | भा दं वि कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ५ | हसिनाबी अमिन मुजावर | ०८/०८/२०१६ फौ.प्र.सं. कलम ४१(अ) ची नोटीस | ०८.०८.२०१६ | भा दं वि कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय **VI** परिच्छेद क्र. ४४ (**iii**))

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.**

**–अभियोगपक्ष –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | बिस्मील्ला जावेद मुजावर | फिर्यादी |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०२ | पाशा मोहम्मद सय्यद | साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०३ | सुमित्रा रामराव मुंढे | साक्षीदार |

ब– **–बचावपक्षाचे साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | -- | – |

क– **–न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | -- | – |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ– **–अभियोगपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाचा सा.क्र. १ नि.क्र. ३६ | फिर्यादी |
| २ | अभियोगपक्षाचा सा.क्र. २ नि.क्र. ४३ | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोगपक्षाचा सा.क्र. ३ नि.क्र. ७२ | साक्षीदार |

ब – **–बचावपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क – –न्यायालयाचे निशाणी क्रमांक –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड – न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

| **अनु.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | -- | -- |

**इ. –भौतिक वस्तु–**

| **अनु.क्र.** | **भौतिक वस्तु क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

**<u>– न्यायनिर्णय –</u>**

(पारीत दिनांक १२.०६.२०२५)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८–अ,३२३,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

२. मौजे आटोळा ता. चाकूर जि. लातूर येथे फिर्यादी बिसमील्लाबी जावेद मुजावर यांचे लग्न दि. १७.०५.२०१५ रोजी आरोपी जावेद मुजावर यांच्यासोबत झाले. लग्नानंतर तीन महिने आरोपींनी फिर्यादीस चांगले नांदविले. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीलस माहेराहून ३ लाख रु. टेंपो घेण्यासाठी घेऊन ये म्हणून सतत शारीरीक व मानसिक त्रास दिला. फिर्यादीच्या मामा, आई वडीलांनी व नातेवाईकांनी समजावून सांगितले परंतू आरोपीमध्ये कांही फरक पडला नाही. फिर्यादीस उपाशी पोटी ठेवून मारहाण केली व शिवीगाळ करुन मानसिक व शारीरीक त्रास दिला. दि. ०६.०८.२०१६ रोजी रात्री ०८.०० वा. आरोपींनी फिर्यादीस माहेराहून पैसे आणीत नाही म्हणून कमरेच्या पट्टयाने मारहाण करुन उदया दुपारपर्यंत पैसे आणले नाहीत तर रात्रीतुन खतम करण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने पोलीस ठाणे चाकूर येथे तक्रार दिली.

३. प्रस्तुतच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिस ठाणे चाकूर येथे दि. ०७.०८.२०१६ रोजी गु.र.क्रमांक २५३/२०१६ भा.दं.वि. कलम ४९८–अ, ३२३,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री.एस.आर. मुंढे, म.पो.उपनिरीक्षक, यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले

आणि तपास पूर्ण झालेनंतर आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. पुर्व पिठासीन अधिकारी यांनी वरील गुन्हयास अनुसरुन आरोपींविरुध्द दोषारोप नि.क्र.२६ नुसार ठेवून आरोपांचे स्वरुप समजावून सांगितले असता आरोपींनी त्यांचे वरील आरोप नाकारुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली व त्याबाबतचे निवेदन नि.क्र.२७ ते ३१ दाखल आहे. आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणेचे बयाण नि.क्र.७३ ते ७७ वर नोंदविण्यात आले.

५. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.१७.०५.२०१५ रोजीच्या ३ महिन्यानंतर पासून ते ०७.०८.२०१६ रोजी पर्यंत मौजे आटोळा ता. चाकूर जि. लातूर येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना टेंपो घेण्यासाठी माहेराहून तीन लाख रु. घेऊन येण्याच्या बेकायदेशिर मागणीच्या पुर्ततेकामी शारीरीक व मानसिक छळ केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | .. नकारार्थी. |
| २. | वर नमुद कालावधीत व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना लाथा बुक्यांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | .. नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | वर नमुद कालावधीत व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्यांना अपमानित केले, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | .. नकारार्थी. |
| ४. | वर नमुद कालावधीत व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय? | .. नकारार्थी. |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**का र ण मि मां सा**

**मान्य केलेल्या बाबी –**

आरोपी क्र. १ हे फिर्यादीचे पती असून त्यांचे लग्न आटोळा येथे ७ वर्षापुर्वी झाला.

**मुद्दे क्र. १ ते ४ करीता** –

६. चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दे क्र. १ ते ४ हे एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आलेले आहेत.

७. मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या **गिरीधर शंकर तावडे वि.. महाराष्ट्र राज्य (२००२) ५ एस.सी.सी. १७७** या न्याय निर्णयामध्ये परि.क्र. २ व ३ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयांनी असे आदेशीत केले आहे की,

"२. समाजातील सद्याच्या प्रवृत्तीमुळे आणि समाजाच्या गरजा पुर्ण करण्यासाठी कायदे मंडळाने भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८(अ) चा समावेश कायदे पुस्तकात प्रकरण XXA हे एक नविन प्रकरण समाविष्ट करणे योग्य मानले. सोयीसाठी कलम ४९८(अ) खाली दिले आहे.

" ४९८(अ). एखाद्या महिलेचा पती किंवा पतीचा नातेवाईक तिला क्रुरतेने बळी देतो – जो कोणी एखाद्या महिलेचा पती किंवा पतीचा नातेवाईक असल्याने, अशा महिलेला क्रुरतेचा बळी देतो त्याला तीन वर्षाच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो दंडासहीत पात्र असेल.

स्पष्टीकरण – या कलमाच्या उद्देशाने "क्रुरता " म्हणजे.

(अ) असे कोणतेही जाणुन बूजून केलेले वर्तन जे अशा स्वरुपाचे आहे की, ज्यामुळे महिलेला आत्महत्या करण्यास भाग पाडले जाऊ शकते किंवा गंभीर दुखापत होऊ शकते किंवा तिच्या जीवाला, अवयांना किंवा आरोग्याला (मानिसिक व शारीरीक) धोका निर्माण होऊ शकतो किंवा

(ब) महिलेचा छळ, जिथे असा छळ तिला किंवा तिच्याशी संबंधीत कोणत्याही व्यक्तीला भेटण्यास भाग पाडण्याच्या उददेशाने केला जात असेल, ती कोणत्याही मालमत्तेची किंवा मौल्यवान सुरक्षेची बेकायदेशिर मागणी करु शकते

किंवा ती किंवा तिच्या संबंधीत कोणत्याही व्यक्तीने अशी मागणी पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यामुळे असेल.

८. वैधानिक तरतुदीचा उद्देश क्रुरता टाळणे आहे, जी आधी नमुद केल्याप्रमाणे त्याच्याशी जोडलेल्या विशिष्ट वैधानिक अर्थाचे श्रेय देऊन परिभाषित केली जाते. कायदेमंडळांनी व्यक्त केलेल्या 'क्रुरता' या शब्दाचा अर्थ सागण्यासाठी दोन विशिष्ट उदाहरणे लक्षात घेतली आहेत: स्पष्टीकरण (अ) मध्ये तीन विशिष्ट परिस्थीतींचा समावेश आहे, जसे की, (i) महिलेला आत्महत्या करण्यास भाग पाडले किंवा (ii) गंभीर दुखापत करणे किंवा (iii) जीव, अवयव किंवा आरोग्याला धोका, मानसिक आणि शारीरीक दोन्ही, आणि अशा प्रकारे शाररीक छळ किंवा अत्याचार यांचा समोवश आहे, स्पष्टीकरणात (ब) शारीरीक दुखापतीचा अभाव आहे परंतू कायदेमंडळाने केवळ जबरदस्तीचा छळ समाविष्ट करणे योग्य मानले जे स्पष्टपणे कायदेशिर हेतू व्यक्त केल्याप्रमाणे शारिरीक दुखापतीशी जुळणारे तितकेच घृणास्पद आहे : तर दुसरी गुप्त आहे परंतू कायद्याच्या तरतुदींच्या बाबतीत तितकीच गंभीर आहे कारण कलम ४९८ (अ) च्या दृष्टीने 'क्रुरता ' चे गुणधर्म देखील त्यात समाविष्ट असतील".

९. अभियोगपक्षातर्फे पहीली घटना ही क्रुरतेच्या स्पष्टीकरणातील अ, संदर्भात आहे. ज्या बाबतील फिर्यादी बिस्मील्ला जावेद मुजावर (अ.सा.क्र.१)

यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, लग्नाच्या तीन महिन्यानंतर तिचा पती व सासू, सासरे हे आटो घेण्याकरीता तिच्या आई वडीलांकडून तीन लाख रु. घेऊन ये असे म्हणत होते. त्यानंतर तिच्या आई वडीलांना तिने बोलाविले होते. त्यानंतर तिचे आई वडील व मामा आले होते व तिच्या आई वडीलांनी पैसे देण्याची ऐपत नाही व साक्षीदार क्र. १ यांना चांगले नांदवा अशी विनंती केली होती. या घटनेची तारीख, वेळ साक्षीदार क्र. १ व २ यांच्या पुराव्यात नमुद करण्यात आलेली नाही. तसेच अभियोगपक्षाचे असे कथन आहे की, दि. १७.०५.२०१५ रोजी आरोपी क्र. १ व साक्षीदार क्र. १ यांचे लग्न झाले आहे. अशा परिस्थीतीमध्ये जर असे समजले की, ती घटना ऑगस्ट २०१५ मध्ये घडली तर त्या महिन्यापासून ते पुढील फिर्याद दिल्याची तारीख ०७ ऑगस्ट २०१६ पर्यंत त्याबाबत तक्रार का दिली नाही. त्याबाबतचे कारण देखील फिर्यादमध्ये किंवा पुराव्यामध्ये नमुद करण्यात आलेले नाही.

१०. तसेच साक्षीदार क्र. २ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कोठेही कथन केले नाही की, ते आरोपींच्या घरी गेले होते व त्यावेळी त्यांची पैसे देण्याची ऐपत नाही व त्यांनी साक्षीदार क्र. १ यांना चांगले नांदविण्याची आरोपींना विनंती केली होती. तसेच ऑगस्ट २०१५ ते ऑगस्ट २०१६ पर्यत आरोपींनी साक्षीदार क्र. १ यांना उपाशी ठेवून त्रास दिल्याचे कथन केले आहे. सदर घटनेबाबत

साक्षीदार क्र. १ यांनी असे कोठेही कथन केले नाही की, त्या जेवण करण्याकरीता गेल्या होत्या, परंतू आरोपींनी त्यांना जेवण करु दिले नाही. तसेच त्याबाबत कोणतीही विस्तृत अशी घटना साक्षीदार क्र. १ यांनी कथन केलेली नाही. सदर घटनेबाबत बळजबरीने त्रास देणे किंवा छळ करणे याकरीता आरोपी यांचे वर्तन हे बळजबरीचे होते याबाबत कोणताही स्पष्ट पुरावा साक्षीदार क्र.१ किंवा २ यांनी दिलेला नाही. अशा परिस्थीतीमध्ये भा.दं.वि.चे कलम ४९८–अ, नुसार साक्षीदार क्र. १ वर आरोपींनी स्पष्टीकरण ब, नुसार क्रुरता केली होती ही बाब सिध्द केलेली नाही.  अशा परिस्थीतीमध्ये भादवि. कलम ४९८–अ अंतर्गचा पुरावा अभियोगपक्षातर्फे सिध्द करण्यात आलेला नाही.

११. साक्षीदार क्र. १ व २ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, त्यांना लग्नानंतर तीन महिने चांगले नांदविले होते. पुढे दोन्ही साक्षीदार यांनी असे कथन केले की, लग्नाच्या तीन महिन्यानंतर भांडण सुरु झाले व आरोपी क्र. १ आणि आरोपी क्र. १ चे आई वडील यांनी आटो घेण्याकरीता तीन लाख रु.ची मागणी केली होती. साक्षीदार क्र. १ असे कथन करतात की, आटो घेण्याकरीता दिड लाख रु. मागणी केली होती. याविरुध्द साक्षीदार क्र. २ असे असे कथन करतात की, टेंपो घेण्याकरीता तीन लाख रु.ची मागणी केली होती. साक्षीदार क्र. १ च्या फौ.प्र.सं. कलम १६१ च्या जबाबामध्ये टेंपो करीता मागणी करण्यात

आली होती असे नमुद आहे. त्यामुळे साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यामध्ये विसंगती दिसून येते.

१२. साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. ०६.०८.२०१६ रोजी आरोपी क्र. १ याने फिर्यादी यांना कमरेच्या पट्टयाने दिवस मावळण्याच्या वेळी मारले होते व दुस–या दिवशी ०३.०० वाजेपर्यंत आई वडीलांकडून पैसे आणले नाही तर जिवे मारतो अशी सर्व आरोपींनी धमकी दिली होती. त्यामुळे फिर्यादी त्यांच्या माहेरी निघुन गेला होती. सदर घटनेबाबत अभियोगपक्षातर्फे फिर्यादी यांना झालेल्या जखमेबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करण्यात आलेले नाही.

१३. त्याबाबत साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले की, त्यांना मारहाण झाल्यानंतर ते दवाखान्यात गेल्या नव्हत्या. साक्षीदार क्र. ३ तपासी अधिकारी यांना वैद्यकीय तपासणी का करण्यात आली नव्हती असा आरोपीतर्फे उलटतपासामध्ये प्रश्न विचारण्यात आला होता. त्यास तपासी अधिकारी यांनी असे उत्तर दिले की, फिर्यादी यांनी वैद्यकीय तपासणी करण्याकरीता नकार दिला होता. अशा परिस्थीतीमध्ये साक्षीदार क्र. १ यांना आरोपी क्र. १ यांनी मारहाण केली होती याबाबत संशय निर्माण होतो. तसेच वैद्यकीय तपासणी न झाल्यामुळे आणि साक्षीदार क्र. १ याने वैद्यकीय तपासणी

करण्यास नकार दिल्यामुळे साक्षीदार क्र. १ यांना मारहाण झाली होती, ही बाब सिध्द होत नाही. अशा परिस्थीतीमध्ये केवळ त्या घटनेवरुन फिर्यादी यांना आत्महत्या करण्यास भाग पाडले होते असे दिसून येत नाही. तसेच त्यांना गंभीर दुखापत झाली होती हे देखील दिसून येत नाही. तसेच दि.०६.०८.२०१६ रोजी साक्षीदार क्र. १ यांना मारहाण झाली होती व त्याद्वारे त्यांचा शारीरीक छळ झाला होता ही देखील बाब संशयापलीकडे सिध्द होत नाही. तसेच दि. ०६.०८.२०१६ पुर्वी साक्षीदार क्र. १ यांना आरोपींनी मारहाण केली होती, याबाबत साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात कोणताही उल्लेख केलेला नाही.

१४. साक्षीदार क्र. २ यांनी असे कथन केले की, लग्नाच्या दोन तीन महिन्यानंतर आरोपी क्र. १ व त्यांचे आई वडील यांनी साक्षीदार क्र. १ यांना पैशांच्या मागणीकरीता मारत होते. परंतू साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये दि.०६.०८.२०१६ पुर्वी आरोपींनी त्यांना मारहाण केली होती, याबाबत कोणताही उल्लेख पुराव्यामध्ये केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यात विसंगती निर्माण होते व त्यामुळे साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येणार नाही. अशा परिस्थीतीमध्ये भा.दं.वि.चे कलम ४९८–अ, नुसार साक्षीदार क्र. १ वर आरोपींनी स्पष्टीकरण अ, नुसार क्रुरता केली होती ही बाब सिध्द केलेली नाही.

१५. साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यात असे आले आहे की, लग्नामध्ये त्यांच्या वडीलांनी दीड तोळे सोने व ४५,०००/– रुपये हुंडा देवून व संसारोपयोगी साहीत्य देवून त्यांचा विवाह करुन दिला. साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्यात असे आले की, फिर्यादी त्यांची मुलगी आहे. परंतू त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कोठेही कथन केले नाही की, आरोपी क्र. १ व फिर्यादी यांच्या लग्नामध्ये दीड तोळे सोने व ४५,०००/– रुपये हुंडा व संसारोपयोगी साहीत्य दिले होते. तसेच अभियोगपक्षातर्फे संसार उपयोगी वस्तु व सोने च्या बाबतच्या बिलांची प्रत अभिलेखावर दाखल केले नाही. तसेच रु.४५,०००/– कोणत्या आरोपीकडे देण्यात आले होते याबाबत कोणताही उल्लेख फिर्यादी, साक्षीदार क्र. १ किंवा साक्षीदार क्र. २ फिर्यादीचे वडील यांच्या पुराव्यात करण्यात आलेला नाही. अशा परिस्थीतीमध्ये फिर्यादीच्या कथनावर विश्वास ठेवता येत नाही.

१६. भादंवि. कलम ३२३ सह कलम ३४ च्या गुन्हयाकरीता साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या फौ.प्र.सं. कलम १६१ च्या नि.क्र.३७ वरील जबाबामध्ये असे कथन केले आहे की, त्यांना लग्नाच्या तीन महिन्यानंतर व दि. ०६.०८.२०१६ रोजी पुर्वी आरोपी हे उपाशी ठेवून मारहाण करीत होते. परंतू त्यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपींनी लग्नाच्या तीन महिन्यानंतर व दि.०६.०८.२०१६ पुर्वी पर्यंत मारहाण केली होती, याबाबत कोणताही उल्लेख

केलेला नाही. अशा परिस्थीतीमध्ये भादंवि. कलम ३२३ सह कलम ३४ च्या गुन्हयाकरीता साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यामध्ये कोणतेही कथन नाही. साक्षीदार क्र. २ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, आरोपी हे साक्षीदार क्र. १ यांना मारहाण करीत होते. परंतू त्याबाबतचा वेळ, दिनांक आणि ठिकाण याबाबत कांहीच नमुद केले नाही. तसेच त्यांच्या समक्ष मारहाण झाली होती हे देखील त्यांच्या पुराव्यातून दिसून येत नाही. त्यामुळे अभियोगपक्षातर्फे भादंवि. चे कल ३२३ करीता कोणताही संशयापलीकडील पुरावा सिध्द करण्यात आलेला नाही.

१७. भादवि. कलम ५०४, सह कलम ३४ च्या गुन्हयाकरीता साक्षीदार क्र. १ व २ यांनी असे कथन केले आहे की, आरोपींनी शिवीगाळ केली होती, याबाबत कोणताही उल्लेख त्यांच्या पुराव्यात केला नाही. तसेच साक्षीदार क्र. १ यांच्या फौ.प्र.सं. कलम १६१ च्या जबाबामध्ये आरोपींनी कोणत्या शब्दामध्ये शिवीगाळ केली होती याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही.

१८. भादवि. कलम ५०६, सह कलम ३४ च्या गुन्हयाकरीता साक्षीदार क्र. १ यांनी असे कथन केले आहे की, दि. ०६.०८.२०१६ रोजी आरोपींनी त्यांना दुस–या दिवशी ०३.०० वाजेपर्यंत तुझ्या आई वडीलांकडून पैसे आणले नाही तर जिवे मारतो असे म्हणून सर्व आरोपी एकत्र आले होते. जरी तशी घटना

घडली असती तर त्या दिवशी साक्षीदार यांना मारहाण झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या वैद्यकीय तपासणीला नकार दिला नसता. जर वैद्यकीय तपासणी झाली असती तर त्याबाबतचा पुरावा अभिलेखावर आला असता. अशा परिस्थीतीमध्ये दि.०६.०८.२०१६ रोजी मारहाणीची व जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती या तोंडी पुराव्याबाबत साशंकता निर्माण होते.

१९. साक्षीदार क्र. १ व २ यांच्या पुराव्यातून भा.दं.वि. कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ करीता संशया पलीकडील पुरावा अभियोगपक्षातर्फे सिध्द करण्यात आलेला नाही. साक्षीदार क्र. १ व २ यांनी आरोपी क्र. ४ व ५ यांचा गुन्हयामध्ये कसा समाविष्ट आहे किंवा त्यांचे इतर आरोपींशी कसे संगनमत होते याबाबत कोणताही उल्लेख पुराव्यामध्ये केलेला नाही. वरील विवेचनेवरुन साक्षीदार यांच्या पुराव्यातून आरोपी यांनी भादंवि. कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ नुसार गुन्हा केला ही बाब सिध्द केलेली नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देतो व मुद्दा क्र.५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपीजावेद अमिन मुजावर, नजमुनबी अमिन मुजावर, अमिन दाऊ मुजावर, दाउत अमिन मुजावर आणि हसिनाबी अमिन मुजावर यांना भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४ |

| | |
|---|---|
| | व ५०६ सह कलम ३४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींनी पुर्वीच दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–ए च्या तरतुदी करीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे.<br>(सदरहू न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

VIKAS SHIVAJI WAGHMODE

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2025.06.12 17:24:25 +0530

दिनांक – १२.०६.२०२५

(व्ही.एस. वाघमोडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | M. B. Pathan |
| Name of the Court | : | Civil J.J.D. & J.M.F.C,Chakur. |
| Date of Order/ Judgment | : | 12/06/2025 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | : | 12/06/2025 |
| Order/Judgment uploaded on | : | 12/06/2025 |